RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-ब

वर्ष १२, अंक ५६] मंगळवार, एप्रिल २१, २०२६/वैशाख १, शके १९४८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक १७७

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

मंत्रालय विस्तार, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २१ एप्रिल २०२६.

अधिसूचना

महाराष्ट्र कापूस बी-बियाणे (पुरवठा, वितरण, विक्री व विक्रीच्या किंमतीचे निश्चितीकरण यांचे विनियमन) अधिनियम, २००९

क्रमांक कृवपदुम-२८०१६/३२४/२०२५-MAG-१७A (१५०४१८३).—महाराष्ट्र कापूस बी-बियाणे (पुरवठा, वितरण, विक्री व विक्रीच्या किंमतीचे निश्चितीकरण यांचे विनियमन) अधिनियम, २००९ (२००९ चा महा. १९) याच्या कलम २२ चे पोट-कलम (१) सह कलम ७ चे पोट-कलम (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा, आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र कापूस बियाणे (पुरवठा, वितरण, विक्री व विक्रीच्या किंमतीचे निश्चितीकरण यांचे विनियमन) नियम, २०१० यात आणखी सुधारणा करण्याचे योजलेल्या नियमांचा पुढील मसुदा हा, त्यामुळे बाधा पोहचण्याची शक्यता असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीकरिता उक्त अधिनियमांच्या कलम २२ चे पोट-कलम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे, आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येत आहे की, उक्त मसुदा महाराष्ट्र शासन दि.२६ मे, २०२६ रोजी किंवा त्यानंतर विचारात घेईल.

२. उक्त मसुद्याच्या संबंधात कोणत्याही व्यक्तीकडून ज्या कोणत्याही हरकती किंवा सूचना कृषि संचालक (नि.व.गु.नि), कृषि आयुक्तालय, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११००१ यांच्याकडे उपरोक्त दिनांकापूर्वी प्राप्त होतील त्या शासन विचारात घेईल.

नियमांचा मसुदा

१. या नियमांना महाराष्ट्र कापूस बियाणे (पुरवठा, वितरण, विक्री व विक्रीच्या किंमतीचे निश्चितीकरण यांचे विनियमन) (सुधारणा) नियम, २०२६ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र कापूस बियाणे (पुरवठा, वितरण, विक्री व विक्रीच्या किंमतीचे निश्चितीकरण यांचे विनियमन) नियम, २०१० त्यांच्या नियम १० नंतर पुढील नियम समाविष्ट करण्यात येईल :-

"१० अ. बियाणे निरीक्षकाची पात्रता.- कोणतीही व्यक्ती शासन मान्यताप्राप्त विद्यापीठातून कृषी विषयात पदवीधर असल्याशिवाय बियाणे निरीक्षक म्हणून नियुक्तीस पात्र ठरणार नाही.".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

संतोष कराड,
शासनाचे उपसचिव

AGRICULTURE, ANIMAL HUSBANDRY, DAIRY DEVELOPMENT AND FISHERIES DEPARTMENT

Mantralaya Annexe,
Mumbai 400 032, Dated the 21st April 2026.

NOTIFICATION

MAHARASHTRA COTTON SEEDS (REGULATION OF SUPPLY, DISTRIBUTION, SALE AND FIXATION OF SALE PRICE) ACT, 2009

No. कृवपदुम-28016/324/2025-MAG-17A (1504183).—The following draft of rules further to amend the Maharashtra Cotton Seeds (Regulation of Supply, Distribution, Sale and Fixation of Sale Price) Rules, 2010, which the Government of Maharashtra proposes to make in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 22 read with sub-section (*1*) of the section 7 of the Maharashtra Cotton Seeds (Regulation of Supply, Distribution, Sale and Fixation of Sale Price) Act, 2009(Mah.XIX of 2009), and of all other powers enabling it in this behalf, is hereby published as required by sub-section (*1*) of section 22 of the said Act, for the information of all persons likely to be affected thereby; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra on or after the 26 May, 2026.

2. Any objections or suggestions which may be received by the Director (Inputs and Quality control) Agricultural Commissioner, Central Building, Pune- 411 001 from any person with respect to the said draft before the aforesaid date will be considered by the Government.

DRAFT RULES

1. This rules may be called the Maharashtra Cotton Seeds (Regulation of Supply, Distribution, Sale and Fixation of Sale Price) (Amendment) Rules, 2026

2. In the Maharashtra Cotton Seeds (Regulation of Supply, Distribution, Sale and Fixation of Sale Price) Rules, 2010, after rule 10, the following rule shall be inserted, namely:-

"10A. Qualifications of Seed Inspectors.- A person shall not be qualified for appointment as Seed Inspector unless he is a graduate in Agriculture of a University recognised for the purpose by the Government.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SANTOSH KARAD,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.